# - प्रेसनोट-

दत्तवाडी पो.स्टेशन पुणे
दि २३/०९/२०१७

## दत्तवाडी पोलीस ठाणेकडुन दुचाकी चोराकडुन ९ दुचाकी गाडया जप्त

दि, २०/०९/२०१७ रोजी दत्तवाडी पोलीस ठाणे कडील अधिकारी व कर्मचारी पो.स्टे. हददीत वाहनचोरीच्या वाढत्या गुन्हानां प्रतिबंधाबाबत पेट्रोलींग करीत असताना तपास पथकातील पो. ना. सुधीर घोटकुले व पो.शि. रोहन खैरे यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, अहमदनगर येथील दोन इसम त्यांचेकडील चोरीची शाईन गाडी क्रं. एम.एच. १२ जे.जे. ०३३६ ही दुचाकी गाडी विकण्यासाठी विश्वकर्मा गॅरेज आंबिलओढा येथे येणार आहेत, अशी खात्रीशीर बातमी मिळालेने ती बातमी वरिष्ठ पोलीस निरिक्षक अनिल पाटील यांना कळवली असता त्यांनी कारवाई करण्याबाबत मार्गदर्शन केले. सदर ठिकाणी पोलीसांनी सापळा लावून १. संदिप पाडुरंग खेडकर वय ३८ वर्षे रा. मु. पो. घाटशिळ पारगाव ता. शिरुर कासार जि. बीड २. सचिन राजु खाडे वय २१ वर्षे रा. तीनखडी पो. टाकळी ता. पाथर्डी जि. अहमदनगर यांना ताब्यात घेवुन अधिक चौकशी करता त्यांनी पर्वती शिवदर्शन परिसरातुन व टिळक रोड परिसरातून एकुण २ गाडया व नगर वरुन १ गाडी चोरल्याचे निष्पन्न झाल्याने, सदरचे दोन्ही आरोपींना अटक करुन त्यांना मा. न्यायालयात दि. २१/०९/२०१७ रोजी हजर केले असता, त्यांना न्यायालयाने ३ दिवसाची दि. २४/०९/२०१७ रोजीपर्यत पोलीस कोठडी दिली असता, आरोपींकडे पोलीसांनी अधिक तपास केला असता, आरोपी संदिप पाडुरंग खेडकर याने नगर व बीड परिसरातून आणखीन ६ दुचाकी चोरल्याचे व त्या गाडया त्याचे गावाला घराजवळ लपवून ठेवल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सदरच्या गाडया जप्त करण्यात आल्या आहेत. अशा एकून ९ दुचाकी अटक आरोपी यांचेकडून जप्त करण्यात आल्या आहेत. अधिक तपास पोलीस उपनिरिक्षक डफळ हे करत आहेत.

सदरची कारवाई ही मा. डॉ. प्रविण मुंडे पोलीस उप आयुक्त सो. परि. २ पुणे शहर, मा. श्री शिवाजी पवार सहा.पोलीस आयुक्त सो. स्वारगेट विभाग पुणे शहर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अनिल पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) कृष्णा इंदलकर, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक अनिल डफळ, पो. हवा. तानाजी निकम, पो. ना. सुधीर घोटकुले, पो. ना. महेश गाढवे, पो.शि. रोहन खैरे, पो.शि. अमित बोडरे, पो.शि. विकास कदम, पो.शि. शरद राऊत, पो.शि. शिवाजी क्षिरसागर, पो.शि.राहुल ओलेकर यांनी कारवाई केली आहे.



HERO HONDA